# झोपडपट्टयांची संक्षिप्त माहिती

अन्न,वस्त्र व निवारा ह्या मानवाच्या तीन जीवनावश्यक गरजा आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे ह्या तिन्ही गरजांची पुर्तता करणे कठीण होत चालले आहे. ह्यामुळे सामान्य नागरिकांना या तिन्ही गरजांची पुर्तता करणेसाठी कठोर परिश्रम करावे लागतात. ग्रामीण भागात तो शेती करतो किंवा शेतक-याकडे काम करतो व त्यापासुन मिळणारे उत्पन्न / मजुरीतुन स्वत:चा, कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. ग्रामीण भागात जागेची कमतरता नसल्याने घराचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत नाही. ग्रामीण भागातुन नागरिक शहरी भागांकडे रोजगारासाठी, अन्न,वस्त्र,निवारा मिळणेसाठी शहराकडे स्थलांतर करतो. शहरी भागात मोठ्या प्रमाणात कारखानदारी असल्यामुळे व बांधकामाची कामे मोठ्या प्रमाणात सुरु असल्यामुळे रोजगारासाठी नागरिक शहरात स्थलांतरीत होतात. शहरात येणारे स्थलांतरित नागरिक, लोकसंख्या वाढ, निवासाची सोय नसणे, जागेच्या व घरांच्या महागड्या किंमती या कारणांमुळे झोपडपट्टया निर्माण होतात व वाढतात.

**पिंपरी चिंचवड शहर हे एक औद्योगिक शहर असुन या ठिकाणी एकुण ५५२५ कंपन्या कार्यरत आहेत व शहरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण होत आहे. मोठ-मोठ्या इमारतींची व इतर बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरु आहेत. ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. रोजगाराच्या संधीमुळे आजुबाजुच्या ग्रामीण भागातुन विविध जिल्ह्यातुन, प्रांतातुन नागरिक मोलमजुरीसाठी शहरात येत असतात व वास्तव्यासाठी योग्य ती व परवडणारी जागा उपलब्ध न झाल्याने ते मनपाच्या , प्राधिकरणाच्या, एम आय डी सी च्या शासनाच्या किंवा खाजगी मालकीच्या मोकळ्या जागांवर आपल्या निवासासाठी अनाधिकृतपणे झोपड्या टाकतात व वास्तव्य करतात. यातुनच पिंपरी चिंचवड शहरात झोपडपट्या निर्माण झाल्या आहेत व वाढत आहेत.**

## सन १९७० ते मार्च २००८ झोपडपट्या व झोपडपट्टीवासियांची माहिती

| अक्र | विगत | सन १९७० | सन १९८३ | सन १९८७ | सन २००० | सन २००५ | सन २००६ | सन २००७ | मार्च २००८ पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | झोपडपट्याची संख्या | ३५ | ५४ | ६५ | ६८ | ७१ | ६८ | ७२ | ७२ |
| २ | झोपड्यांची संख्या | ५६२८ | १३३१० | २१३२६ | २७३२६ | ३५८४७ | ३३२३३ | ३६०७३ | ३५३२२ |
| ३ | झोपडपट्टीतील लोकसंख्या | २६४७० | ६५९८९ | ९६२७२ | ११२२५० | १४६६८७ | १३३३३३ | १४७८६४ | १४७९७९ |

**सन १९७० साली मनपा क्षेत्रात फक्त ३५ झोपडपट्यां होत्या व त्यात राहणा-यांची लोकसंख्या २६,४६० होती. सन १९८३ साली झोपडपट्यांची संख्या ५४ झाली व झोपडपट्टी वासियांची संख्या ६५९८९ झाली, म्हणजेच १३ वर्षात झोपडपट्टी वासियांच्या संख्येत १५० % पेक्षा जास्त वाढ झाली.**

पिंपरी चिंचवड शहरातील झोपडपट्यांची विभागवार गणना सन १९८७ मध्ये करण्यात आली होती. त्यावेळेस शहरात एकुण ६५ झोपडपट्या असल्याचे दिसुन आले होते. व सदर झोपडपट्या विविध शासकिय, निमशासकिय संस्था व खाजगी जागेवर असल्याचे निदर्शनास आले होते. गणनेनुसार ह्या ६५ झोपडपट्यांमधील झोपड्यांची संख्या २१,३६९ होती व त्यात राहणा-यांची लोकसंख्या ९६,२७२ इतकी होती. ह्या ६५ झोपडपट्यां पैकी १३ झोपडपट्यांचे पुर्नवसन करण्यात आले होते व एका झोपडपट्टीचे निष्कासन करण्यात आले. दोन झोपडपट्या प्राधिकरणाने काढून टाकल्या. उर्वरित ५० झोपडपट्यामधील झोपड्यांची संख्या १९,१३० होती. ह्या ५० झोपडपट्यांपैकी ३३ झोपडपट्या घोषित होत्या व १७ झोपडपट्या अघोषित होत्या.

पुढे सप्टेंबर १९९७ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये शहरालगतची १७ नविन गावे समाविष्ठ झाली. नवीन १७ गावांमधील १७ झोपडपट्या व जुन्या हद्दीत नव्याने निर्माण झालेल्या ८ झोपडपट्या अशा एकुण २५ झोपडपट्यांची वाढ झालेचे निदर्शनास आले.

**वरील आकडेवारीवरुन असे दिसते की, १९७० साली शहरात फक्त ६००० झोपड्या होत्या. शहरातील झोपड्या वाढत वाढत आता त्याची संख्या ३५,३२२ पर्यंत पोहोचली आहे. त्याचप्रमाणे १९७० साली झोपडपट्टीत राहणा-यांची संख्या फक्त २७,००० होती, वाढत जाऊन २००७ सालापर्यंत झोपडीत राहणा-यांची संख्या अंदाजे १,४७,९७९ पर्यंत पोहोचली आहे.**

यावरुन असे दिसते की, झोपडपट्ट्यात राहणा-यांचे प्रमाण सतत वाढत चालले आहे, व झोपड्या व झोपडपट्या नियंत्रण व निर्मुलन करण्याचे मनपाचे आश्वासन साध्य करणे कठीण आहे.

## *मनपा क्षेत्रातील झोपडपट्यांबाबतची माहिती :-*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे एकुण क्षेत्र १७०.५६ चौ.कि.मी. आहे. म्हणजेच सतरा कोटी छपन्न लक्ष चौ.मी. आहे. एकुण मनपा क्षेत्रापैकी ७२ झोपडपट्यांनी १०,९७,९८४.७२ चौ.मी. (१०९.७९ हेक्टर ) म्हणजेच १.०९ चौ.कि.मी. क्षेत्र व्यापले आहे. शहरातील एकुण क्षेत्रापैकी फार थोडी जागा झोपडपट्यांनी व्यापली असून त्यात राहणा-यांची लोकसंख्या १,४७,९७९ आहे. यावरुन असे निदर्शनास

येते की, शहरातील १४.७०% लोकसंख्या फक्त १.०९ चौ.कि.मी. वर म्हणजेच ०.६४% जागेवर दाटीवाटीने राहत आहेत

**पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रात अस्तित्वात असणा-या ७२ झोपडपटयांमध्ये एकुण १,४७,९७९ लोकसंख्या राहते. मनपा परिसरात प्रती झोपडपट्टी सरासरी लोकसंख्या २०५५ आहे. (स.नं. ६८ ते ७४) ह्या झोपडपट्टीचे क्षेत्रफळ सर्वात जास्त आहे. (आनंदनगर चिंचवड) झोपडपट्टी सर्वात मोठी असुन त्यात १०,४१८ लोक राहतात व सर्वात लहान झोपडपट्टी (उत्तमनगर, पिंपरी), (रतीलाल भगवानदास) असुन त्याची लोकसंख्या ७५ आहे.**

शहरातील झोपडपट्यांमध्ये राहणारे नागरिक हे नैसर्गिक आपत्ती उदा. पुर, दुष्काळ, बेरोजगारी, गरीबी या व इतर अडचणी व आपत्तींमुळे शहरात स्थलांतरीत झालेले असतात. शहरा बाहेरुन आलेले व झ‍ोपडपट्टीत राहणारे नागरिक सुध्दा माणसे आहेत व त्यांना सुध्दा दैनंदिन जीवन सोईचे होण्यासाठी नागरी सुविधा म्हणजेच पाणी पुरवठा, राहण्यासाठी घर, स्वच्छ परिसर, शौचालय, वैद्यकिय सुविधा इ. ची गरज असते. अशा प्रकारच्या मुलभुत नागरी सेवासुविधा उपलब्ध करुन त्यांचे जीवनमान उंचावणे आवश्यक असते. झोपडपट्यामध्ये राहणारे नागरिक गरीब व आर्थिक दृष्टया कमकुवत असले तरी ते शहराच्या विकासाचा, अर्थकारणाचा व दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक असतात. शहराच्या उभारणीसाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ व दैनदिन जीवनातील गरजा पुरविण्यासाठी नागरिकांना त्यांची नितांत आवश्यकता असते.

झोपडपट्टीत राहणा-या नागरिकांचे आरोग्य उत्तम राहणे जसे त्यांच्या दृष्टीने आवश्यक आहे, तसेच ते शहरातील इतर उच्चभ्रु व श्रीमंताच्या दृष्टीने सुध्दा गरजेचे आहे. झोपडपट्यांमधील अस्वच्छता व अनारोग्यकारक परिस्थिती व त्यात राहणा-या नागरिकांमध्ये असणारे संसर्गजन्य आजार व रोगराईचा संसर्ग शहरातील इतरांमध्येही पसरू शकतो. जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने झोपडपट्टयांत राहणा-या नागरिकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे मुलभुत नागरी सुविधा पुरविण्याबरोबरच त्यांना चांगली पक्की घरे देण्यासाठी काही झोपडपट्यांचे पुनर्वसन या पुर्वीच करण्यात आले आहे.

झोपडपट्टी पुनर्वसनाबाबतची संक्षिप्त माहिती खालील तक्त्यामध्ये सादर केली आहे.

| अ.क्र | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प पुर्ण केल्याचे वर्ष | दिलेल्या गाळ्यांची संख्या | झालेला खर्च र. रु. |
|---|---|---|---|---|
| १ | निगडी पेठ क्र २२ येथे २५६ गाळे बांधणे | १९७७-७८ | २५६ | १३.९५ लक्ष |
| २ | निगडी पेठ क्र. २२ येथे ३३३३ ओटे बांधणे | १९८४-८५ | ३३३३ | १६७.०० लक्ष |
| ३ | निगडी पेठ क्र २२ येथे महापालिका सफाई कामगारांसाठी ५७६ गाळे बांधणे | १९८७-८८ | ५७६ | ४४९.०० लक्ष |
| ४ | भाटनगर पिंपरी | १९९०-९१ | १०८८ | ३५५.०० लक्ष |
| ५ | निगडी पेठ क्र. २२ येथे ३४६८ गाळे बांधणे | १९९२-९३ | ३४६८ | १०५४.०० लक्ष |
| ६ | चिंचवड इंदिरानगर येथे ३४४ गाळे बांधणे | १९९४-९५ | ३४४ | १९४.०० लक्ष |
| ७ | मिलिंदनगर पिंपरी कॅम्प २१८४ गाळे | २००४-०५ (पहिला टप्पा ८८२ पुर्ण) | ८८२ | १५६८.००लक्ष |
| ८ | अजंठानगर एम.आय.डी.सी. | २००४ (पहिला टप्पा) | ६९२ | ७१३.९२ लक्ष |
| | **एकुण** | | **१०६३९** | **४५१४.८७ लक्ष** |

**प्रत्येक झोपडपट्टीचा सखोल अभ्यासानंतर त्यांना मानांकानुसार आवश्यक असणा-या सुविधांचा तक्ता खालीलप्रमाणे**

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका - झोपडपट्ट्याबाबत संक्षिप्त माहिती

| अ.क्र. | माहिती | |
|---|---|---|
| १ | झोपडपट्टी<br>झोपड्यांची संख्या<br>क्षेत्रफळ चौ.मि. | ७२<br>३५३२२<br>१,४७,९७९ |
| २ | लोकसंख्या<br>अ) स्त्री<br>ब) पुरुष<br>क) एकुण | <br>७०९७०<br>७७००९<br>१,४७,९७९ |
| ३ | संडास ब्लॉक्स<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ सीट प्रती १० कुटुंबे<br>१७२० सिट्स<br>१८१२सिट्स |

| | | |
|---|---|---|
| ४ | नळ कोंडाळे<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ नळ कोंडाळे/ प्रती ३० कुटुंबे<br>९००<br>२७७ |
| ५ | गटारे (र.मी.)<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१.५२ मी. प्रती झोपडी<br>६५०७०<br>० |
| ६ | बालवाडी<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ प्रती ३६० कुटुंबे<br>९२<br>०६ |
| ७ | समाज मंदीर<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ प्रती ३६० कुटुंबे<br>५१<br>४७ |
| ८ | विजेचे खांब<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ प्रती ६२५ चौ.मी.<br>१८१३<br>० |
| ९ | वेलफेअर सेंटर<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ प्रती ६६० कुं.<br>०<br>९८ |
| १० | रस्ते<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>२१३३१७ चौ.मी.<br>३९६८९५ चौ.मी. |
| ११ | झाडे<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ प्रती ५० कु.<br>३६९<br>३३७ |
| १२ | कचरा कुंडी<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ प्रती ५०० कु.<br>३०<br>४१ |
| १३ | गांडुळ खत प्रकल्प<br>मानांक<br>सद्यस्थिती<br>वाढीव जरुरी | <br>१ प्रती ५०० कु.<br>०<br>७१ |

७२ झोपडपट्टयांमध्ये एकुण ३५३२२ झोपड्या आहेत, त्यात राहणा-यांची लोकसंख्या १४७९७९ इतकी आहे. प्रती १० कुटुंबास एक संडास सिट्स याप्रमाणे एकुण लोकसंख्येसाठी एकुण ३५३२ संडास सिट्स असणे आवश्यक आहे. परंतु सद्यस्थितीत १७२० इतकेच सिट्स उपलब्ध आहेत. म्हणजेच मानांकानुसार एकुण १८१२ सिट्स कमी पडत आहेत. शौचालय व्यवस्था अपुरी असल्यामुळे झोपडपट्ट्यांच्या परिसरात उघड्यावर शौचास बसण्याची समस्या दिसुन येते. यामुळे शहराच्या सौंदर्यास व आरोग्यास बाधा निर्माण होते. उघडयावर शौचास बसण्याच्या सवयींमुळे समाजात रोगराई पसरते, ही समस्या दुर करण्यासाठी झ- ोपडपट्टीमध्ये मानांकानुसार शौचालये निर्माण करण्यात यावीत. उपलब्ध शौचालयांचा वापर होण्याच्या दृष्टीने झोपडपट्टीवासीयांचे सतत प्रबोधन व आरोग्य शिक्षण करणे आवश्यक आहे.

सध्या झोपडपट्ट्यांमध्ये मनपाच्या सार्वजनिक नळकोंडाळयामार्फत पाणीपुरवठा केला जातो. सार्वजनिक नळकोंडाळया मार्फत पाणी मिळत असल्याने त्याचा योग्य पध्दतीने व योग्य प्रमाणात वापर होत नाही, ज्यामुळे पाणी मोठ्या प्रमाणावर वाया जाते. पाण्याची बचत करण्यासाठी सार्वजनिक नळकोंडाळी कमी करुन त्याऐवजी सामुहिक नळजोड आणि वैयक्तिक नळजोड उपलब्ध करून देणेसाठी मनपा प्रशासनातर्फे प्रयत्न सुरु आहे. ह्या प्रयत्नास नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद देणे आवश्यक आहे.

**झोपडपट्यांमध्ये असणा-या अनेक गटर्सची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. या बरोबरच झोपडपट्टीतील नागरिक गटारामध्येच कचरा टाकत असतात. त्यामुळे गटार तुंबुन साचलेल्या पाण्यामध्ये डासोत्पत्ती स्थानके निर्माण होतात. हे टाळण्यासाठी प्रत्येक भागातील सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक यांच्या सहकार्याने झोपडपट्यामध्ये साफसफाई व स्वच्छते संदर्भात जनजागरण करणे आवश्यक आहे. प्रत्येक झोपडपट्टीत किमान ३६० घरामागे एक बालवाडी व १ समाज मंदिर असणे आवश्यक आहे. परंतु बालवाडयांची तसेच समाज मंदिराची संख्या झोपडपट्टयांमध्ये अत्यल्प आहे.**

पिंपरी चिंचवड क्षेत्र - ७२ झोपडपट्यांमध्ये राहणा-या ३५३२२ कुटुंबासाठी मानांकाप्रमाणे (Accepted Norms) आवश्यक नागरी सुविधांची सद्यस्थिती, वाढीव गरज, फरकाचा व त्यासाठीच्या

खर्चाचा गोषवारा पुढीलप्रमाणे-

| अ.क्र. | नागरी सुविधांचे नाव | मानांक / Norm | मानांकाप्रमाणे आवश्यक (A+B) | सद्यस्थिती (A) | सुविधा आवश्यक (B) | खर्च प्रति युनिट | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संडासाचे सिटस | १ सीट/प्रती १० कुटुंब | ३५३२ | १७२० | १८१२ | ४०००० | ७२४८०००० |
| २ | नळ कोंडाळे | १ नळ कोंडाळे/ प्रती ३० कुटुंबे | ११७७ | ९०० | २७७ | ५००० | १३८५००० |
| ३ | स्ट्रिट लाईटस | १ स्ट्रिट लाईट/प्रती ६२५ चौ.मी. | १७५७ | १८१३ | ०.०० | १५००० | ०.०० |
| ४ | गटारे | १.५र.मी./प्रती झोपडी | ५२९८३ | ६५०७० | ०.०० | ४५० | ०.०० |
| ५ | बालवाडी | १ बालवाडी / प्रती ३६० कुटुंबे | ९८ | ९२ | ६ | २ लाख | १२००००० |
| ६ | समाजमंदिर | १ समाज मंदिर/ प्रती ३६० कुटुंबे | ९८ | ५१ | ४७ | ५ लाख | २३५००००० |
| ७ | झाडे | १ झाड/ प्रती ५० कुटुंबे | ७०६ | ३६९ | ३३७ | ५००/- | १६८५०० |
| ८ | वेलफेअर सेंटर | १ वेलफेअर सेंटर प्रती ३६० कुटुंब | ९८ | ०० | ९८ | ५ लाख | ४९०००००० |
| ९ | कचराकुंडीची व्यवस्था | १ कचराकुंडी/ प्रती ५०० कुटुंबे | ७१ | ३० | ४१ | ७५०० | ३०७५०० |
| १० | गांडूळ खत प्रकल्प | १ गांडूळ खत/ प्रती ५०० कुटुंबे | ७१ | ०० | ७१ | ५००० | ३५५००० |

## -: झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण :-

आजच्या परिस्थितीत जगाच्या स्थरावर मालमत्तेची चांगली किंमत असणा-या ठिकाणापैकी पुणे व पिंपरी चिंचवड हे ठिकाण आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत १०,९७,९८४.७२ स्क्वे.मि. जागेत एकुण मनपा क्षेत्रफळाच्या ०.६४% झोपडपट्टी आहेत. त्या झोपडपट्टीत खाजगी, एम.आय.डी.सी. महानगरपालिका, रेल्वे यांची जागा व्यापलेली आहे. सध्याच्या परिस्थितीत या जागेची बाजारभावाप्रमाणे जादा किंमत आहे. अशा जागा निविदा काढुन एखाद्या नामांकित बांधकाम व्यवसायिकास दिल्यास या झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करणे शक्य आहे. झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसनाचा विचार करता अशा बांधकाम व्यवस्थायिकास जादा चटई क्षेत्र मंजुर करुन दिल्यास या कामास अधिक गती येईल.

पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्रातील झोपडपट्टी वासियांच्या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी मुंबई महानगरपालिकेने झोपडपट्टी वासियांसाठी राबविण्यात आलेल्या पुनर्वसन योजनेप्रमाणे पुणे - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टी यांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र शासनाने झोपडपट्टी अधिनियम १९७१ कलम अ नुसार मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली व इतर मंत्र्यांचे सदस्य स्वरुपात पुणे पिंपरी चिंचवड झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणचे गठण करण्यात आले आहे. आणि मा. आयुक्त त्याबद्दल नियमावली तयार करून दिनांक ०१/१०/२००५ रोजी ती वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन दिनांक २०/१०/२००५ पर्यंत नागरीकांच्या हरकती व सुचना मागविणेत आल्या होत्या. अंतिम नियमावली दिनांक - ०१/११/२००५ रोजी मंजुर झाली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्यांचे सर्वेक्षण दि. १४/०२/२००६ रोजी मशाल संस्थेने दिलेल्या माहितीवरुन असे दिसुन येते की, मनपाच्या ७२ झोपडपट्यापैकी ०१ झोपडपट्टीचे पुनर्वसन चालु आहे. ७१ पैकी ३२ झोपडपट्यांचे पुनर्वसन होण्यासारखे आहे. ०१ झोपडपट्टी ही खाजगी जागेवर व उर्वरित ३१ झोपडपट्या सरकारी, एम.आय.डी.सी., महानगरपालिका या जागेवर आहे. ३२ पुनर्वसन होऊ शकणाऱ्या झोपडपट्यांचे (११,००० कुटुंबे) पुनर्वसन करिता अंदाजे र. रु. ११५ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर ३२ झोपडपट्ट्यांपैकी काही झोपडपट्ट्या डी.पी. रोडवर आहेत व काही झोपडपट्या रेल्वेच्या जागेवर आहे व काही नदी काठी अथवा नाल्यालगत असल्याने त्याचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. तरी पर्यावरणाचे संरक्षणाचे आणि नागरी हिताचे दृष्टीकोनातुन मनपा प्रशासनाने अशा जागा ताब्यात घेणे जरुरीचे आहे आणि सेक्टर २२ येथे मनपाच्या ताब्यातील ४० हेक्टर जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणे शक्य होईल.

सद्यस्थितीत अजंठानगर झोपडपट्टीचे दुस-या टप्पाचे बांधकाम चालु करणार असुन त्या अंतर्गत ५८४ गाळे बांधावयाचे आहे. त्यासाठी र रु ७८०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. उर्वरित ४७० गाळे तिस-या टप्प्यात करण्यात येणार आहे. त्यासाठी र रु ५६४ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

## *"स्वस्तात घरकुल योजना "*

पिंपरी चिंचवड शहर सन २०११ पर्यंत पुर्णपणे झोपडपट्टीमुक्त करण्याचे उद्देशाने, झोपडपट्टी पुनर्वसन योजना स्वतंत्रपणे राबवित आहे. तसेच शहरात नवीन झोपड्या निर्माण होऊ नयेत म्हणुन आर्थिक दृष्ट्या परवडणारी घरकुल योजना (ॲफॉरडेबल हाऊसिंग स्कीम) राबविणे आवश्यक असल्याने आर्थिक दुर्बल घटकांसाठी (इकॉनॉमिकली वेकर सेक्शन) योजनेअंतर्गत शहरातील गरिबांसाठी घरकुल योजना (हाऊस फॉर अर्बन पुअर) केंद्र शासन व राज्य शासनाचे आर्थिक मदतीने पुर्ण करून त्याअंतर्गत शहरात १३२५० नवीन घरे बांधण्याचे ठरविले आहे. यात लाभार्थीचा आर्थिक हातभार फक्त २५ ते ३०% असेल या घराचे एकुण क्षेत्रफळ ४६५ चौरस फुट असुन त्यात स्वयंपाकघर, संडास, बाथरुम, बैठक खोली व बेडरुम तसेच बाल्कनीचा अंतर्भाव असेल. यापैकी ४०० चौरस फुटांसाठी केंद्रशासनाची मदत असेल तर उर्वरित क्षेत्र लाभार्थीचे आर्थिक सहभागातुन महानगरपालिका पुर्ण करेल.

सर्वसामान्य गरीबांसाठी ही योजना वरदान ठरणारी आहे. त्यामुळे गरिबांना हक्काचे घर प्राप्त होणार आहे. या योजनेअंतर्गत खरे लाभार्थी पात्र ठरण्यासाठी दंडनीय कार्यवाही कठोर करण्यात आली आहे. तरी फक्त खऱ्या गरजुंनीच या योजनेत अर्ज करावेत व पिंपरी चिंचवड शहर झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी सहकार्य करावे.

मनपा हद्दीतील झोपडपट्टी संदर्भातील माहिती मशाल या संस्थेच्या अहवालावर आधारित सदर माहिती या पर्यावरण सद्य:स्थिती अहवालात समाविष्ठ करण्यात आली आहे. या माहितीसाठी पर्यावरण कक्ष व मनपा मशाल या संस्थेचे आभार मानत आहे.

## संक्षिप्त अहवाल :-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका झोपडपट्यांचे व त्यातील झोपडीधारकांचे १०० % सर्व्हेक्षण करुन व त्याचे संगणकीकृत नकाशे तयार करून प्रारुप विकास आराखडयाचे काम पुर्ण करणारी

भारतातील पहिली महानगरपालिका आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मशाल ह्या स्वयंसेवी संस्थेमार्फत तयार करुन घेतलेल्या अहवालात निदर्शनास आलेल्या महत्वाच्या बाबी पुढील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| • शहराची एकुण लोकसंख्या | १२.५० लक्ष |
| • शहराचे क्षेत्रफळ | १७०.५६ चौ.कि.मी. |
| • शहरातील झोपडपट्याची संख्या | ७२ |
| • झोपडपट्टीत राहणा-यांची लोकसंख्या | १,४७,९७९ |
| • झोपडपट्टयांखालील क्षेत्र | १०,९७,९८४.७२ चौ.मी. |
| • झोपडपट्याखालील क्षेत्राचे शहराच्या एकुण क्षेत्रातील प्रमाण | ०.६४% |
| • झोपड्यांची सरासरी घनता | ३२२ टेनामेंट प्रति हेक्टर |
| • प्रति झोपडी सरासरी क्षेत्र | ३१.०८ चौ.मी. प्रति हेक्टर |
| • झो.पु.यो.व्दारा झो.पु.यो. राबवुन विकास करणे शक्य असलेल्या झोपडयांची संख्या | ३२ |
| • स्वस्तात घर मिळु शकेल अशा आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबाची अंदाजे संख्या | १३२५० कुटुंबे |
| • झोपडपट्टी पुर्नवसन योजनेअंतर्गत केंद्रशासनाच्या जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत अल्प किंमतीत (१०,०००) मध्ये पक्की घरे मिळणाऱ्या कुटुंबाची संख्या | १८,००० |
| • मानांकाप्रमाणे झोपडपट्यांमध्ये सुविधा पुरविण्यसाठी लागणारी अंदाजे खर्च | र. रु. १४.८४ कोटी |

- प्रशासनाच्या मालकीच्या से.नं. २२, प्राधिकरण येथे गाळे बांधणे व अजंठानगर पुनर्वसन प्रकल्पाअंतर्गत गाळे बांधणेसाठी वरील योजनेअंतर्गत र रु ३९०.०० कोटी मान्यता मिळाली आहे.

## मनपा हद्दीतील झोपडपट्ट्यांच्या जागेची मालकी बाबतचा माहिती तक्ता

| अ.क्र. | जागेची मालकी | अ | ब | क | ड | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राधिकरण | ६ | ० | १ | १ | ८ |
| २ | एम.आय.डी.सी | ८ | १ | ० | ५ | १४ |
| ३ | खाजगी | १ | ९ | २ | ५ | १७ |
| ४ | सरकारी | १ | ४ | ६ | २ | १३ |
| ५ | महापालिका | ० | २ | ३ | ० | ५ |
| ६ | मिश्रीत | - | - | - | - | - |
| | अ) सरकारी + रेल्वे | ० | २ | ० | १ | ३ |
| | ब) मनपा + खाजगी + रेल्वे | ० | १ | ० | ० | १ |
| | क) खाजगी + रेल्वे | १ | २ | ० | ३ | ६ |
| | ड) सरकारी + खाजगी | ० | ० | २ | १ | ३ |
| | मनपा + सरकारी | ० | ० | १ | ० | १ |
| | एम.आय.डी.सी +खाजगी | ० | १ | ० | ० | १ |
| एकुण | | १७ | २२ | १५ | १८ | ७२ |

टिप - (आरक्षण)

१. आ.क्र. २८९, झो. सुधारणा-१८.५०मी. ३६.६०मी.व २४.४०मी. रस्ता रुदीकरण आ.क्र.२९९ स्क्रॅप मार्केट आ.क्र. २९७ पिकनिक स्पॉट व निवासी

२. ६१.०० मी. रस्ता रुंदीकरण

३. आ.क्र. २९२, झोपडपट्टी सुधारणा १२ मी. व ३६मी रस्ता व निवासी झोन

४. ३१ मी. रस्ता डी.पी. नुसार व ६१ मी. रस्ता रुंदीकरण व औद्योगिक झोन

५. निवासी व औद्योगिक झोन

६. रेल्वे स्टेशन निवासी झोन आपन स्पेस, एल.सी.१२ मी. रस्ता

७. ६१.०० मी. रस्ता रुंदीकरण

८. आ.क्र. ३०० झोपडपट्टी सुधारणा आ.क्र. २९५ प्राथमिक शाळाव ९ मी व ४५ मी. डी.पी.रस्ता

९. आ.क्र. २९६/२९८ झोपडपट्टी सुधारणा आ.क्र. २९७ पिकनिक स्पॉट हिरवा पट्टा व १८.५०, ४५ मी. डी.पी.रोड

१०. निवासी झोन

११. आ.क्र. १७९ भाजी मंडई - ०.०८ हे शॉपिंग सेंटर आ.क्र.१७८ पार्किंग - ०.०६ हे

१२. औद्योगिक झोन १८.३० मी. रस्ता,पब्लिक/से.मी.पब्लिक झोन,आ.क्र. १८१ पार्क,ओपन स्पेस

१३. सरकारी गायरान (हिरवा पट्टा व १५ मी. डी.पी.रस्ता)

१४. निवासी झोन व २४.०० मी. डी.पी. रस्ता

१५. रस्ता रुंदीकरणातील जागा

१६. रस्ता रुंदीकरणातील जागा

१७. ६१ मी. रस्ता रुंदीकरणातील जागा व निवासी झोन

टिप - (आरक्षण)

१. ४५.०० मी. व १८.०० मी. डी.पी. रोड, आ.क्र. ४/४२ झोपडपट्टी पुर्नवसन योजना

२. निवासी झोन व १८ मी. रस्ता रुंदीकरण

३. ९.मी.व २४ मी. रस्ता रुंदीकरण व निवासी झोन

४. निवासी झोन व ४५.०० मी. डी.पी. रस्ता रुंदीकरण

५. निवासी झोन २४ मी. रस्ता व बल्क लॅन्ड

६. आ.क्र. १४० झोपडपट्टी सुधारणा

७. आ.क्र. १४० झोपडपट्टी सुधारणा व १८ मी. डि.पी.रस्ता व हिरवा पट्टा निवासी झोन

८. आ.क्र. १४० झोपडपट्टी सुधारणा व १८ मी. डि.पी.रस्ता

९. आ.क्र. १४३ झोपडपट्टी सुधारणा ९ मी.,१२ मी.व १८ मी. रस्ता व निवासी कमर्शियल झोन

१०. ग्रीन बेल्ट १८.०० मी. डी.पी. रस्ता, आ.क्र. १४० झोपडपट्टी पुनर्वसन व निवासी भाग

११. हिरवा पट्टा व १५ मी. डी.पी. रोड

१२. निवासी झोन व ९मी. १ १२ मी. रस्ता रुंदीकरण

१३. ९ मी. डी.पी. रस्ता व आ.क्र. १४१ झोपडपट्टी पुनर्वसन

१४. ९मी. डी.पी.रस्ता व आ.क्र. १४१ व १४२ कमर्शियल झोन

१५. औद्योगिक झोन ६१ मी. रस्ता रुंदीकरण